THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 24TH DECEMBER 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २ माहे डिसेंबर सन १८९६.

नंबर ९७०१.—खालीं दिलेला हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला आहे :—

"फिनान्स अँण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

### स्टांप.

नान्-जुडिशियल स्टांप.

माफी.

मुक्काम कलकत्ता, तारीख २७ माहे नव्हेंबर सन १८९६.

**नंबर ५०२२-एस्. आर.**—ज्याअर्थीं, अमदाबाद म्युनिसिपालिटीस जी १,००,००० रुपयांची रकम कर्जी काढण्याचा अधिकार दिलेला असून जी १ ते २०० नंबरांचे व सन १८९६ च्या आक्टोबर महिन्याच्या १ल्या तारखेचे प्रत्येकीं १०० रुपयांचे डिबेंचर काढून उभी करावयाची आहे, तिजवर पडणाऱ्या स्टांप ड्यूटीबद्दल सदरहू म्युनिसिपालिटीनें फिनान्स अँण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील ठराव नंबर ३६४६,* तारीख १३ माहे नव्हेंबर सन १८८० याच्या अटींअन्वयें १०० रुपयांची उक्ती रकम सरकारी तिजोरींत भरली आहे, त्याअर्थीं सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट याच्या ८ व्या कलमांत दिलेला अधिकार चालवून आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, सदरहू डिबेंचर काढतेवेळीं, नवीन करून देतेवेळीं, त्यांपैकीं एका ऐवजीं अनेक करतेवेळीं किंवा अनेकांऐवजीं एक सबंध करतेवेळीं त्यांवर जी कोणतीही स्टांपड्यूटी द्यावी पडती ती माफ केली आहे.

* तारीख १८ माहे नव्हेंबर सन १८८० चें मुंबई सरकारी गझेट, भाग १, पृष्ठ ९४५, यावर पुनः प्रसिद्ध केलेला.

(सही) जे. एफ्. फिन्ले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. मॉण्टीथ,

आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.